## अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९४२ /२०२५ दि. २२ /०७/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत शिवमंदिर येथील विकासकामे करावयाची असल्याने शिव मंदिर कमान पासुन ते परांजपे चाळ चौकापर्यत जाणारा रस्ता दि.२३/०७/२०२५ रोजी पासुन कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहे. करीता सदर रोडवरून जाणारी सर्व प्रकारची वाहने इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) अंबरनाथ रेल्वे स्टेशन कडुन शिव मंदिर कमान मार्गे परांजपे चाळ कडे जाणारा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांना **शिव मंदिर कमान** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ) मोटार सायकल, ऑटो रिक्षा व छोटया चारचाकी वाहने** ही बारकु पाडा चौक येथुन डावे बाजुला वळण घेवुन पुढे शिवमंदिर शिवसेना शाखा, येथुन पुढे मंगल छाया हौ. सोसायटी समोर परांजपे चाळ चौकातुन डाव्या बाजुने इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **ब) मोठी वाहने** शिवमंदिर कमान पासुन गोविंद तिर्थ पुल येथुन उजवे बाजुला वळण घेवुन पुढे हिंदु स्मशान भुमी येथुन उजवे बाजुला वळण घेवुन वैभव हॉटेल येथुन उजवे बाजुला वळण घेवुन पालेगाव चौक येथुन उजवे बाजुला वळण घेवुन रूद्र को.ऑ.सो.सा. ऑरेंज मेडीकल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पालेगाव चौक येथुन अमन गॅरेज, मिरा ॲव्हलोन बिल्डींग कडुन परांजपे चाळ मार्गे शिव मंदिर कमान कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **मंगल छाया हौ. सोसायटी समोर परांजपे चाळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ) मोटार सायकल, ऑटो रिक्षा व छोटया चारचाकी वाहने** ही मंगल छाया हौ. सोसायटी समोर परांजपे चाळ चौक येथुन उजवे बाजुला वळण घेवुन शिवमंदिर शिवसेना ाखा येथुन बारकु पाडा चौक येथुन ईच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **ब) मोठी वाहने** अमन गॅरेज येथुन ऑरेंज मेडीकल मार्गे पालेगाव चौक येथुन डावे बाजुला वळण घेवुन वैभव हॉटेल मार्गे हिंदु स्मशान भुमी येथुन डावे बाजुला वळण घेवुन गोविंद तिर्थ पुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसुचना दि. २३/०७/२०२५ रोजी पासुन पुढे कायमस्वरूपी अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.

CamScanner